म.रा.वि. वितरण कंपनी मर्या.,
कामगार विभाग,४ था मजला,
प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
संदर्भ क्र. कामगार/ब/कर्कनि/३७८०७
दिनांक : १७ ऑक्टोबर, २००६.

# परिपत्रक

विषय: कर्मचा-यांच्या अवलंबितांना 'चिकन गुनिया' या आजारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याबाबत.

**************

अलिकडे नव्याने उद्भवलेल्या 'चिकून गुनिया' आजाराची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रभर ठिक ठिकाणी पसरली आहे. या आजाराची तिनही कंपनीतील कर्मचा-यांच्या अवलंबिताना मोठ्या प्रमाणात झालेली बाधा विचारात घेऊन या आजाराकरिता झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती **कर्मचारी कल्याण निधीमधून** देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

१) वैद्यकीय अधिकारी, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / वैद्यकीय सल्लागार यांनी प्रमाणित केल्यानुसार किंवा खाजगी वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र शासकीय वैद्यकीय अधिका-याने प्रतिस्वाक्षरीत केल्यास 'चिकून गुनिया' या आजाराने बाधीत झालेल्या कर्मचा-यांच्या अवलंबितांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रु. १५००/- (रु. एक हजार पाचशे फक्त) पर्यंत मंजूर करण्यात येईल.

२) औष्णिक विद्युत केंद्र येथे काम करणा-या कर्मचा-यांच्या अवलंबितांना तेथील दवाखान्यातील वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य राहील.

३) उपरोक्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची सवलत प्रत्येक व्यक्तीस फक्त एकदाच देण्यात येईल.

४) वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यालयातील मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असल्याने अशी प्रकरणे कामगार व औद्योगिक संबंध विभागाकडे पाठवावीत.

सदर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची सवलत दिनांक १ ऑगस्ट २००६ पासून पुढील सूचना मिळेपर्यंत लागू राहील.

सदस्य / सचिव, क.क.नि.स. व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सादर :

१) मा.व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) / (महानिर्मिती) / (महापारेषण)
२) सर्व मुख्य अभियंता क्षेत्रीय कार्यालय (महावितरण) / (महापारेषण)
३) सर्व मुख्य महाव्यवस्थापक, (निर्मिती) / औ.वि.केंद्र, महानिर्मिती कंपनी.
४) मुख्य महाव्यवस्थापक (क) / (मनुष्यबळ). (महावितरण) / (महानिर्मिती) / (महापारेषण).

प्रत रवाना: सर्व अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, क्षेत्रीय कार्यालय.

D:\kam B on\kknik\c ukan guniya sanavedi.doc